# प्रेस नोट

ता. ०१/०८/२०१९

## गुन्हे शाखा, युनिट २ कडून सराईत गुन्हेगारास ०२ गावठी पिस्टल सह अटक

पुणे शहर व शहरालगतच्या हद्दीतील गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करुन त्यांचेहातून कोणताही गुन्हा घडू नये म्हणून सदर रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पाळत ठेवून त्यांना गुन्हा करण्यापासून परावृत्त करुन कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही तसेच फरारी आरोपींचा शोध घेण्याबाबत मा. अशोक मोराळे सो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे , मा. बच्चन सिंग, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. डॉ शिवाजी पवार सो, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे यांनी गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना सर्तक राहून रेकॉर्ड वरील गुन्हेगार यांचेवर पाळत ठेवून त्यांना वेळोवेळी चेक करुन गुन्हा करण्याचे तयारीत असल्यास तात्काळ जेरबंद करण्याबाबत आदेश दिले होते.

सदर आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी गजानन पवार यांनी त्यांचे युनिट मधील अधिकारी व कर्मचारी यांना आदेश दिले होते. युनिट २ कडील अधिकारी व कर्मचारी बंडगार्डन पो.स्टे हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना व फरारी गुन्हेगारांचा शोध घेत असताना युनिट २ मधील पोना मॅगी जाधव यांना बातमीदारामार्फत पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे दत्ता नंदलाल शर्मा ऊर्फ चिन्या, वय ३० वर्षे रा. रामनगर, बोपखेल पुणे हा बोटक्लब रोड येथे गावठी पिस्तूलाची विक्री करण्याकरीता येणार असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा लावून पकडून त्याची पंचासमक्ष अंग झडती घेतली असता त्याचे कब्जात एक गावठी बनावटीचे पिस्टल कि.रु. ३०,०००/-, एक गावठी बनावटीचे रिव्हॉलवर कि.रु. २५,०००/- व चार जिवंत काडतुसे कि.रु. ८००/- असे एकूण कि.रु. ५५,८००/- चा मुद्देमाल मिळून आला. सदर बाबत कोरगाव पार्क पोलीस स्टेशन गुरनं. २३१/२०१९, आर्म ॲक्ट ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपी पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार असून त्याचेवरती यापूर्वी खडकी व वडगाव मावळ पोलीस स्टेशन या ठिकाणी दोन खुनाचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंग, सहा पोलीस आयुक्त, डॉ शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक गजानन पवार, सपोनि जयवंत जाधव, पोलीस कर्मचारी अनिल ऊसुलकर, यशवंत आंब्रे, दिनेश गडांकुश, अस्लम पठाण, मॅगी जाधव, गोपाळ मदने यांनी केलेली आहे.


Crime Branch Unit 2, Pune City